# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ६९-२३ दिनांक :- ०१/०३/२०२३

## घरफोडी करणा-या आंतरराज्यीय टोळीतील आरोपीतांस अटक
## गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांची कामगिरी.

दिनांक २१/०२/२०२३ रोजी फिर्यादी नामे श्रीमती ज्योती अर्जुन जाधव, वय ४३ वर्षे, रा. ए विंग, रुम नं २०२, दिवान मॅन्शन बिल्डींग नं.०९, तुप्ती हॉटेलचे बाजुला कल्पना केअर हॉस्पिटल जवळ, अंबाडी क्रॉस पंचवटी हॉटेल वसई (प) ता. वसई जि. पालघर यांच्या राहत्या घराचे बंद दरवाजाच्या वाटे कोणीतरी अज्ञात चोरटयाने सकाळी ११.३० ते १४.१५ वा. चे दरम्यान प्रवेश करुन २,१३,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज घरफोडी चोरी केल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ५५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४५४, ३८० अन्वये दिनांक २१/०२/२०२३ रोजी दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई-विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासुन घरफोडी चोरींच्या प्रमाणात दिवसें-दिवस वाढ होत असल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हे उघडकीस आणण्याबात सुचना दिल्या होत्या.

प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष २, वसई युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे मिळालेल्या माहितीवरुन अरोपीत नामे १) अरमान शौकिन खान, वय ३१वर्ष, रा. ई/२०६, ईंद्रा गल्ली, ईस्ट बाबरपुर, राज्य दिल्ली, २) रवि मुन्नालाल जोनालीया, वय ३२ वर्ष, रा. ए/१०६, सुअेट बॅकेजवळ, गोकुळपुरी,राज्य दिल्ली यांना अहमदाबाद, राज्य गुजरात दिशेने प्रवास करीत असताना ताब्यात घेण्यात आले. आरोपीत यांचे ताब्यातील सामानामधुन घरफोडीचे गुन्हे करण्यासाठी वापरल्या जाणा-या २ कटावण्या, पोपट पाना आणि स्क्रुडायव्हर अशी हत्यारे त्याचप्रमाणे महागडी घडयाळे, जुन्या बंद झालेल्या चलनी नोटा, पाकिटे, हार्ड डिस्क, मोबाईल आणि रोख रक्कम असा ऐवज मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला. आरोपीत यांचेकडे केलेल्या चौकशीत त्यांनी वरनमुद गुन्हा केल्याचे सांगितल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली. आरोपीत यांचेकडे अधिक तपास करता ते दिल्ली येथून घरफोडी चो-या करणेकरीता त्यांचा साथीदार रमेशकुमार बैसाखीराम कालु ऊर्फ एलीयास कालु रा. मौजपुर कच्ची कॉलनी, राज्य दिल्ली याचे सोबत येत असल्याचे निष्पन्न झाले. त्यांचेकडे केलेल्या चौकशीत अटक आरोपीत यांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे.

## -: आरोपीत यांचे कडुन उघड झालेले घरफोडीचे गुन्हे :-

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ५५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ३८० प्रमाणे |
| २. | पेल्हार पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ९४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ३८० प्रमाणे |
| ३. | आचोळे पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ११७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ३८० प्रमाणे |
| ४. | माणिकपुर पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ५९/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४,४५७,३८०,५११ प्रमाणे |
| ५. | आचोळे पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. ४३३/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ६. | सायन पोलीस ठाणे, मुंबई | गुन्हा रजि. नं.५६/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ३८० प्रमाणे |

नमुद अटक आरोपीत क्रमांक १ अरमान शौकिन खान याचे विरोधात खार, बांद्रा, माहीम, गोरेगाव, बांगुरनगर, मालाडे, एम. एच. बी. बोरीवली, समता नगर पोलीस ठाणे मुंबई येथे २५ हुन अधिक गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २, वसई युनीटचे पो.नि.श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम.अमोल कोरे, सायबर शाखेचे स.फौ. संतोष चव्हाण तसेच आर. पी. एस रजत बिष्णोई सी.ओ. सुमेरपुर, एस. एच. ओ. सरजिल मलीक सांडेराव पोलीस ठाणे, राज्य- राजस्थान, यांनी केली पार पाडली आहे.




------000-----